ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3484. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख २० जुलै, १९५५ | अंक २८

## विविध माहिती

**कागदाचा आणखी एक कारखाना**— कॅनरा जंगलांत दांडेली ह्या गांवांत कागदाचा कारखाना काढण्याचा विचार मुंबईचें सरकार करीत आहे. कारखाना उभारण्यासाठी २ कोटी रुपये खर्च येईल आणि त्यांत रोज ६० टन कागद उत्पादन करतां येईल असा अंदाज आहे. हा कारखाना निघाल्यास भारतामधील तो १९ वा कागदाचा कारखाना होईल.

**ऑस्ट्रिआची रशिआला नुकसानभरपाई**— ऑस्ट्रिआनें रशिआला द्यावयाच्या नुकसानभरपाईबद्दल उभयतां राष्ट्रांत दोन करारावर सह्या करण्यांत आल्या. ऑस्ट्रिआंतील जर्मन मालमत्ता रशिआनें आपल्या ताब्यांत घेतली होती. ती परत ऑस्ट्रिआच्या ताब्यांत देण्यासाठी ऑस्ट्रिआ रशिआला १५ कोटी डॉलर्सचा माल देणार आहे. रशिअन मालकीच्या तेलाच्या कारखान्यावरील हक्क सोडून देण्यासाठी ऑस्ट्रिआ रशिआला तेल देणार आहे.

**बुद्धाच्या निर्वाणाचा २,५०० वा दिन**—पुढील वर्षी भगवान गौतमबुद्धाच्या निर्वाणाचा २,५०० वा दिन भारतांत साजरा करण्यांत येणार आहे. ह्या समारंभासाठी भारतीय सरकार ७७ लाख रुपये खर्च करणार आहे. त्यांपैकी ३७ लाख प्रत्यक्ष समारंभासाठी आणि ४० लाख जरूर ते रस्ते बांधण्यासाठी खर्च करण्यांत येणार आहेत.

**नेहरूंचा रशिआंतील दौरा**—पं. नेहरूंच्या रशिआंतील दौऱ्याचा रंगीत बोलपट रशिआच्या सांस्कृतिक खात्यानें तयार केला आहे. बोलपट तयार करण्यासाठी २९ फोटोग्राफर्स आळीपाळीनें खपत होते. पं. नेहरू रशिआंतून परत फिरल्यावर पांच दिवसांच्या आंत तो संपूर्णपणें तयार करण्यांत आला. हिंदी भाषेंतील निवेदन त्याला जोडण्यांत आलें आहे.

**महाराष्ट्रांतील गुळाचें उत्पादन**— १९५४-५५ च्या हंगामांत महाराष्ट्रांत सुमारें १ कोटी गुळाच्या ढव्यांचें उत्पादन करण्यांत आलें. ह्या गुळाची किंमत ७ कोटी रुपये असावी. मागील हंगामापेक्षा चालू वर्षी गुळाचें उत्पादन ३० टक्क्यांनीं वाढलें. एकूण उत्पादनापैकी ६५ लाख खडे परप्रांतांत निर्यात करण्यांत आले.

**'गांधी केंद्रां'ची स्थापना**— गांधी-स्मारक-निधीतर्फे भारतांतील १०० निवडक खेड्यांत 'गांधी-केंद्रें' स्थापन करण्यांत येणार आहेत. गुजरातमध्यें अशीं पांच केंद्रें स्थापन करण्यांत येतील. ग्रामीण भागांतील कामगारांना शिक्षण देणें आणि सामाजिक शिक्षणाचे वर्ग चालविणें हीं कार्यें केंद्रें करतील. सर्व केंद्रांसाठी मिळून ३० लाख रुपये खर्च येईल.

**आंध्र राज्यांतील हातमाग**— आंध्र राज्यांतील हातमागाच्या धंद्याला आर्थिक साह्य करण्यासाठी राज्य-सरकार एक स्वतंत्र बँक काढण्याचा विचार करीत आहे. तथापि, ह्या बाबतींत अखेरचा निर्णय मध्यवर्ती सरकार घेईल. १९५२ ते १९५५ पर्यंत राज्यसरकारनें हातमागाच्या सहकारी संस्थांना ८१ लाख रुपयांची मदत केली आहे.

**उत्तर-प्रदेशांत कागदाचा नवीन कारखाना**—उत्तर-प्रदेश सरकारनें डेहराडूनच्या जवळ कागदाचा कारखाना उभारण्याचा विचार चालविला आहे. संकल्पित कारखान्यांत रोज ५० टन वजनाचा कागद निर्माण करण्याची व्यवस्था होईल. त्याशिवाय नैनितालच्या तराई विभागांत एक साखरेचा कारखाना काढण्याचाहि विचार चालू आहे. ह्या भागांतून ८० लाख मण उसाचा पुरवठा होण्याची शक्यता आहे.

**रेल्वेच्या डब्यांची परदेशांतून आयात**—भारतीय रेल्वेतर्फे पोलंड व फ्रान्समधील कांहीं कंपन्यांकडे रेल्वेच्या डब्यांच्या मागण्या नोंदविण्यांत आल्या आहेत. पोलंडमधील कंपनीकडून रुंद रुळावर चालणारे मालाचे २,६०० डबे घेण्यांत येणार आहेत. त्यांची किंमत ३.५५ कोटी रुपये होईल. फ्रान्समधील कंपनीकडून ३०० ब्रेकव्हॅन्स घेण्यांत येतील. त्यांची किंमत सुमारें ३४ लाख रुपये असेल.

**सौराष्ट्रांतील नव्या शाळा**—सौराष्ट्र सरकारनें येत्या डिसेंबर महिन्यापर्यंत राज्यांत १,००० शाळांसाठी इमारती बांधण्याचें उद्दिष्ट ठेवलें आहे. इमारती पूर्ण करण्यास सुमारें ६० लाख रुपये खर्च येईल. सौराष्ट्रांतील लोकांनींहि शिक्षणप्रसाराच्या मोहिमेस चांगली आर्थिक मदत केली आहे. राजकोट येथें बहिऱ्या व मुक्यांसाठींहि एक शाळा काढण्यांत आली आहे.

**अणुशक्तीचा औद्योगिक उपयोग**—एंजिनिअरिंगच्या धंद्यांत अणुशक्तीचा उपयोग कसा करावा, ह्यासंबंधीं रशिआंतील शास्त्रज्ञ व एंजिनिअर्स संशोधन करीत आहेत. रशिअन शास्त्रज्ञांनीं 'बेटाट्रोन' नांवाचें एक अणुशक्तीचलित हत्यार शोधून काढलें आहे. ह्या हत्याराच्या साह्यानें धातूंचा तुकडा अंतरावरून कापता येतो.

**कृत्रिम तांदळाची निर्मिति**—अमेरिकेंतील व्हर्जिनिआ संस्थानांतील एका कॉलेजांत डॉ. गुहा नांवाचे भारतीय शास्त्रज्ञ कृत्रिम तांदूळ तयार करण्यासंबंधीं संशोधन करीत आहेत. उत्पादन करण्यास सोपा व स्वस्त अशा प्रकारच्या कृत्रिम तांदुळाचा आपण शोध लावला असल्याचें डॉ. गुहा ह्यांचें म्हणणें आहे. हा तांदूळ सडीक तांदुळापेक्षा आहारास अधिक उपयुक्त असल्याचाहि त्यांचा दावा आहे.

**दिल्ली येथें राष्ट्रीय नाट्यगृह**—दिल्ली येथें बांधण्यांत यावयाच्या राष्ट्रीय नाट्यगृहाची इमारत कशा प्रकारची असावी हें ठरविण्यासाठी हैद्राबाद सरकारचे माजी सार्वजनिक बांधकाम-मंत्री नवाब झैन यारजंग परदेशाच्या दौऱ्यावर जात आहेत. भारतीय सरकारनेंच त्यांना हें काम सांगितलें आहे. नबाबसाहेब निष्णात स्थापत्यशास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्ध आहेत.

**बल्गेरिआंत भारतीय चित्रपट महोत्सव**—बल्गेरिआची राजधानी सोफिआ येथें भारतीय बोलपटांचा एक सप्ताह नुकताच साजरा करण्यांत आला. ह्या प्रसंगीं बल्गेरिअन सरकारचे बडे अधिकारी व परदेशीय वकील हजर होते. एका बल्गेरिअन लेखकानें भारतीय चित्रपट-कलेविषयीं आपला अहवाल ह्या प्रसंगीं वाचून दाखविला.

**अमेरिकेंतील शेतीचा अभ्यास**—रशिआंतील शेतकऱ्यांचें व शेतीशीं संबंध असलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचें प्रतिनिधी-मंडळ अमेरिकेच्या शेतीचा अभ्यास करण्यासाठी विमानानें अमेरिकेला गेलें आहे. मक्याचें पीक व खाण्यासाठी कत्तल करण्यांत येणाऱ्या डुकरांची निपज ह्यांचा अभ्यास विशेषेंकरून करण्यांत येणार आहे.

**दिल्ली येथील आंब्यांचें प्रदर्शन**—दिल्ली येथें भरविण्यांत आलेल्या आंब्यांच्या प्रदर्शनांत निरनिराळ्या जातींचे ३०० आंबे ठेवण्यांत आले होते. ह्या प्रदर्शनांत भाग घेतलेल्या स्पर्धेसाठी ९ विशेष बक्षिसें व १५० सामान्य बक्षिसें जाहीर करण्यांत आलीं होतीं. सामान्य बक्षिसांची किंमत ४,००० रुपयांच्यावर होती. विशेष बक्षिसें पेप्सु राज्यांतील सरकारी बागायत अधिकाऱ्याला व लखनौमधील एका गृहस्थाला मिळून देण्यांत आलीं.

**एक रुपयाच्या नव्या नोटा**—भारतीय सरकारनें एक रुपयाच्या नव्या नोटा काढल्या असून त्या लवकरच व्यवहारांत येतील. नव्या नोटांवर फिनॅन्स खात्याचे सध्यांचे सेक्रेटरी श्री. एच. एम्. पटेल ह्यांची स्वाक्षरी असेल. पूर्वीच्या नोटांवर माजी सेक्रेटरी श्री. के. जी. आंबेगांवकर ह्यांची सही होती. त्यांची सही असलेल्या नोटाहि कायदेशीर चलन म्हणून वापरांत राहणार आहेत.

**शेती-संशोधनाची संस्था**—भोपाळ सरकारनें भारताचे मंत्री मरहूम रफी अहमद किदवाई ह्यांच्या स्मरणार्थ शेती-विषयक संशोधन करणारी एक संस्था काढण्याचें ठरविलें आहे. संस्थेसाठी स्वतंत्र इमारत बांधण्यांत येणार आहे. इमारतीसाठी सुमारें ९ लाख रुपये खर्च येईल.

**फ्रेंच शास्त्रज्ञाचा गौरव**—डॉ. कॅमिल गेरी ह्या फ्रेंच डॉक्टरांनीं क्षयरोगप्रतिबंधक लस शोधून काढलेली आहे. त्यांचें वय ८२ वर्षांचें आहे. बी. सी. जी. लस, ती हीच. ह्या डॉक्टर-संशोधकांचा गौरव म्हणून फ्रेंच सरकारनें त्यांना १,००० पौंडांचें बक्षिस दिलें आहे.

**आंध्र सरकारला कर्ज**—मध्यवर्ती सरकारनें आंध्र राज्य-सरकारला १९५५–५६ सालांत ७५ लाख रुपयांची रक्कम कर्ज म्हणून देण्याचें कबूल केलें आहे. राज्यांतील लोकलबोर्डांतर्फे आंखण्यांत आलेल्या पाणीपुरवठ्याच्या व ड्रेनेजच्या योजनांवर ही रक्कम खर्च करण्यांत येणार आहे.

५०
वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

☆ सरदारगृह ☆

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

म्यूच्युअल कंपन्यांत सर्वांत अधिक बोनस वाटणारी महाराष्ट्रांतील अग्रेसर विमा कंपनी !!

दि सेन्ट्रल म्यूच्युअल लाईफ इन्शुअरन्स कं. लि.

हयातींतील विम्यास : दरसाल दर हजारीं रु. ७
हयातीनंतरच्या विम्यास: ,, ,, ,, रु. ९

ठिकठिकाणीं प्रतिनिधी नेमणें आहेत.

६७ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई
शं. न. आगाशे, मॅनेजिंग डायरेक्टर

स्थापना १९३६
युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा
[ शेड्यूल्ड बँक ]
हेड ऑफिस—*पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.*
शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी व लोणंद
ता. ३१-१२-५४ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | २,१०,००० |
| ठेवी | रु. | ७८,९७,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ९१,००,००० |

मुदत ठेवींवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

वहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार टक्के)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | २-०-० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

# अर्थ

बुधवार, ता. २० जुलै, १९५५



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## भारताच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा

### रिझर्व्ह बँकेचा 'करन्सी आणि फायनान्स' संबंधीं १९५४–५५ बाबत अहवाल

रिझर्व्ह बँक दरसाल प्रसिद्ध करीत असलेला वरील आढावा नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्यांत प्रथम, नेहेमींप्रमाणें, पहिल्या भागांत, आंतरराष्ट्रीय आर्थिक घडामोडी थोडक्यांत देऊन त्यांच्या पार्श्वभूमिवर दुसऱ्या भागांत हिंदी आर्थिक घडामोडींचें तपशीलवार वर्णन देण्यांत आलेलें आहे. १९५१–५२ ते १९५४-५५ ह्या पंचवार्षिक योजनेंतील मुदतीबाबत आंकडेवारीच्या साहाय्यानें खुलासेवार प्रगतीचा परिचय करून देण्यांत आला आहे.

### १९५४–५५ चीं वैशिष्ट्यें

१९५४–५५ चीं वैशिष्ट्यें औद्योगिक उत्पादनांत झालेली वाढ, पैशाच्या पुरवठ्यांत वाढ, किंमतीमध्यें घडून आलेला उतार, सरकारी अंदाजपत्रकांतील वाढत्या तुटी, परराष्ट्रीय व्यापारांत लहानशी अनुकूल तफावत व बचतीच्या प्रवाहास मिळालेली गति, अशीं सांगतां येतील. सरकारी अंदाजपत्रकें तुटीचीं होतीं, तरी फाजील चलनविस्ताराचीं चिन्हें दिसून आलीं नाहींत आणि आर्थिक परिस्थितीमध्यें बरीच प्रगति आढळून आली. शेतीच्या कांहीं मालाचे बाबतींत किंमती इतक्या घसरल्या कीं, सरकारला मधें पडून त्या सावराव्या लागल्या. बेकारीचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीनें, मूळ पंचवार्षिक योजनेंत रोजगार वाढविण्याच्या व्यवस्थांचा १९५३–५४ मध्यें अंतर्भाव करावा लागला, आणि दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतहि रोजगार वाढविण्यावरच भर देण्यांत येत आहे.

### औद्योगिक व शेतीच्या उत्पादनांत वाढ

१९५० पासून औद्योगिक उत्पादन वाढत आलेलें आहे. पंचवार्षिक योजना सुरू झाल्यापासून तें ४०% वाढलेलें १९५३ चे मानानें १९५४ मध्यें औद्योगिक उत्पादनांत ८% वाढ झाली. कच्च्या मालाचा भरपूर पुरवठा आणि मालक–मजुरांतील संबंधांमध्यें सुधारणा, ह्यामुळें हें घडून येणें शक्य झालें. साखरेखेरीज करून बाकी सर्वच महत्त्वाच्या उद्योगधंद्यांनीं वाढ दाखविली.

धान्याचें उत्पादन १९५३–५४ मध्यें पुष्कळच वाढलें; पंचवार्षिक योजनेंतील लक्ष्य ४५ लक्ष टनांनीं मागें टाकलें. १९५४–५५ मधील उत्पादन त्यापेक्षा फार कमी भरणार नाहीं. पण कपास, चहा, ऊंस, गळिताचीं धान्यें ह्यांचें उत्पादन वाढून एकूण उत्पादन १९५३–५४ च्या उच्च पातळीवरच राहील, असा अंदाज आहे. अन्नविषयक सर्वसाधारण परिस्थिति समाधानकारक राहून, धान्याचा केलेला सांठा १६ लक्ष टनांच्या आसपास आहे. धान्याची आयात कमी करण्यांत आल्यामुळें, परदेशी हुंडणावळीवरील ताण उतरला आहे.

### पैशाचा वाढता पुरवठा

वाढत्या उत्पादनाबरोबर आणि आर्थिक उलाढालींबरोबर पैशाच्या वाढत्या पुरवठ्याची गरजहि निर्माण झाली. १९५४-५५ मध्यें तो ७% म्हणजे १२४ कोटी रुपयांनीं वाढला. त्यापूर्वीच्या वर्षांतील वाढ ७२ कोटी रुपये एवढी होती. मध्यवर्ती सरकारचें तुटीचें अंदाजपत्रक व बँकांनीं दिलेल्या कर्जांत वाढ, ह्यांतून पैशाची वाढती गरज दृग्गोचर झाली. बँकांकडील ठेवींत वाढ आणि रिझर्व्ह बँकेनें मोसमी कर्जपुरवठ्याची केलेली व्यवस्था, ह्यांमुळें बँकांवर अवास्तव ताण पडला नाहीं. आर्थिक विकासांवरील वाढता खर्च आणि तुटीची अर्थव्यवस्था ह्यांमुळें बँकांकडील ठेवींत वाढ होत चालली आहे; भारताच्या फाळणीनंतरच्या ठेवी कमी होण्याच्या प्रवृत्तीस पायबंद बसला आहे. किंमती उतरलेल्या आहेत, ह्यावरून पैशाच्या वाढत्या पुरविण्याचा परिणाम फाजील चलननिर्मितींत झालेला नाहीं, हें स्पष्ट दिसून येईल.

### स्टेट बँक

अहवालाचे वर्षीं रूरल क्रेडिट सर्व्हे–कमिटीचा अहवाल प्रसिद्ध झाला. तिच्या शिफारसीप्रमाणें स्टेट बँक ऑफ इंडियाची स्थापना होऊन तिच्या कारभारास प्रारंभहि झालेला आहे. शाखावाढ, पैशाच्या वर्गावर्गीस सवलती, वेअरहाउसेसची सोय झाल्यानंतर व मालाच्या उठावाची तजवीज झाल्यानंतर खेडेगांवीं भांडवल-पुरवठ्यांत मोठी वाढ, इत्यादि मार्गांनीं स्टेट बँक शेतीच्या व्यवसायास मदत करणार आहे. राज्यानिहाय केंद्रीय सहकारी बँकांमार्फत शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करण्याचे कामीं रिझर्व्ह बँकेची मदत चालू राहीलच.

कर चौकशीमंडळाचा अहवालहि प्रसिद्ध झाला, त्यांतील शिफारशीसुद्धां दूरगामी स्वरूपाच्या आहेत. १९५५–५६ च्या मध्यवर्ती सरकारच्या बजेटांत ह्या मंडळाच्या सूचनेनुसार सुमारें १३ कोटी रुपयांच्या जादा करांची तरतूद केलेली आहे.

### परराष्ट्रीय व्यापार

१९५४ मध्यें परराष्ट्रीय व्यापारांत ४ कोटी रुपयांचा लहानसा वाढावा आढळला; १९५३ सालीं तो ५९ कोटी रुपये एवढा होता. मजुरांच्या हितसंवर्धनाचं सरकारचें पाऊल पुढेंच पडत आहे. एम्प्लॉईज स्टेट इन्शुअरन्स योजना व एम्प्लॉईस प्रॉव्हिडंट फंड योजना ह्या बाबतींत अहवालाचे वर्षीं आणखी प्रगति झाली.

विकास योजना व नॅशनल एक्स्टेशन योजना, ह्यांचेखाली १९५४–५५ अखेर ९०,००० खेडीं व ५½ कोटी ग्रामीण लोक यावयाचे होते. लोकांचें हार्दिक सहकार्य व त्यांची १९५४–५५ अखेरपर्यंत १० कोटी रुपयांची रोखीची व इतर मार्गांनीं मदत, ही ह्या संबंधांतील महत्त्वाची घटना आहे. सरकारनें स्वतः ३०.५ कोटी रुपये खर्च केलेले आहेत.

## १९५४–५५ मधील आर्थिक प्रगति दर्शविणारे कांहीं तक्ते

(१) किंमतींचा इंडेक्स नंबर
(ऑगस्ट, १९३९ असेरचें कर्ज = १००)

| | मार्च १९५४ | मार्च १९५५ | बदल % |
|---|---|---|---|
| खाद्य पदार्थ | ३७१ | २९७ | –२० |
| औद्योगिक कच्चा माल | ४६२ | ४१२ | –११ |
| अर्ध पक्का माल | ३५६ | ३३३ | – ६ |
| पक्का माल | ३७४ | ३७६ | + १ |
| इतर | ६८७ | ५५३ | –१९ |
| जनरल इंडेक्स | ३९४ | ३५४ | –१० |

(२) पैशाच्या पुरवठ्यांत वाढ किंवा घट

| | १९५१–५२ | १९५२–५३ | १९५३–५४ | १९५४–५५ | १९५१–५२ ते १९५४–५५ |
|---|---|---|---|---|---|
| १. जनतेजवळील चलन | –११५ | –१७ | +३० | +८२ | –२० |
| २. बँकांचीं रिमांड देणीं | – ५४ | –११ | + १ | +४९ | –२२ |
| ३. रिझर्व्ह बँकेकडील राज्य सरकारांच्या ठेवी | – १ | – ५ | +४३ | – २ | +३४ |
| ४. रिझर्व्ह बँकेकडील इतर ठेवी | – ६ | – ३ | + २ | – ५ | –१६ |
| ५. (अ) जनतेजवळील पैसा (१+२+३+४) | –१७६ | –४४ | +७२ | +१२४ | –२४ |
| ५. (ब) राज्यसरकारांच्या ठेवी वगळून, जनतेजवळील पैसा | –१७५ | –३९ | +३० | +१२७ | –५८ |

### भारतामधील जॉइंट स्टॉक कंपन्या

मध्यवर्ती सरकारनें जॉइंट स्टॉक कंपन्यासंबंधीचा आपला ताजा अहवाल प्रसिद्ध केला आहे. अहवालांत कंपन्यांसंबंधी पुढीलप्रमाणें माहिती दिलेली आहे. १९५४–५५ सालांत भारतामधील कंपन्यांच्या अधिकृत भांडवलांत चौपट वाढ झालेली दिसून येते. १९५३–५४ सालांत कंपन्यांची संख्या ११९३ होती व त्यांचें अधिकृत भांडवल ५६·४ कोटी रुपये होतें. १९५४–५५ सालांत १,२०३ सार्वजनिक अगर खाजगी कंपन्या स्थापन करण्यांत आल्या व त्यांचें एकूण अधिकृत भांडवल २२६ कोटी रुपये होतें. १,२०३ कंपन्यांपैकी २१९ पब्लिक कंपन्या असून त्यांचें भांडवल १७४·९ कोटी रुपये आहे. बाकीच्या खाजगी असून त्यांचें भांडवल ५१·१ कोटी रुपये आहे. १९५३–५४ सालाची १९५४–५५ सालाशीं तुलना करतां असें दिसतें कीं सार्वजनिक भांडवलाच्या नवीन कंपन्यांच्या संख्येंत १५ वी वाढ झालेली आहे. खाजगी भांडवलाच्या नव्या कंपन्यांच्या संख्येंतच्ची घट झालेली आहे. नव्या कंपन्यांची राज्यवार विभागणी कशी झाली आहे हें पहातां मुंबई राज्य व पश्चिम बंगाल राज्य ह्या दोन राज्यांतच जवळ जवळ ६० टक्के नव्या कंपन्या निघालेल्या आहेत असें आढळून येतें. मुंबई राज्यांत २२० नव्या कंपन्या आणि पश्चिम बंगाल राज्यांत ५०५ नव्या कंपन्या निघाल्या. मद्रास राज्यांत ११६ नव्या कंपन्या निघाल्या. त्रावणकोर–कोचीन राज्यांत ५३, राजस्थान राज्यांत २१ आणि दिल्ली राज्यांत १०४ नव्या कंपन्या स्थापन करण्यांत आल्या. १९५४–५५ ह्या आर्थिक वर्षांत १ कोटी रु. अगर अधिक अधिकृत भांडवल असलेल्या ४२ नव्या कंपन्या रजिस्टर करण्यांत आल्या.

### चहाचा खप

अर्थाच्या ६ जुलै, १९५५ च्या अंकांत भारतांतील वेगवेगळ्या राज्यांतील १९५३–५४ सालांतील चहाच्या खपाचे आंकडेवार माहिती दिली आहे, ती फारच महत्त्वाची आहे. सदर माहितीवरून पहातां, चहाच्या खपाचें सर्वांत कमी प्रमाण उत्तर प्रदेशांत दिसून येतें. त्याच्यानंतर ओरिसा राज्याचा नंबर लागतो. उत्तर प्रदेशांतील चहाच्या खपाच्या आंकड्यांवरून पहातां तेथें सरासरी दरसाल दरमाणशीं चहाचा खप एक औंसाहूनहि कमी दिसून येतो. ओरिसा राज्यांत हें प्रमाण माणशीं सुमारें सव्वा औंसापर्यंत पडतें. आपल्या मुंबई राज्यांत हें प्रमाण माणशीं एक पौंड पडतें.

चहाचा खप उत्तर प्रदेशांत कमी असण्याचें कारण तेथें दुधाची विपुलता हें असावें कीं काय? तेथें दूध मुबलक मिळत असल्यामुळें चहा घेण्याकडे प्रवृत्ति कमी असावी असा निष्कर्ष काढावयाचा, किंवा इतर कांहीं कारणें आहेत? यासंबंधानें जास्त उलगडा होण्याची जरूरी आहे असें वाटतें. तेव्हां, या बाबतींत तपशिलवार साधार माहिती उत्तर हिंदुस्थानांतील कोणी अभ्यासूनें दिल्यास ती फारच उद्बोधक होईल असें वाटतें. हा विषय कोणा अभ्यासूस संशोधनासहि घेतां येईल.

या. कृ. कोगेकर.

### दारू न पिणारांचेच फक्त मोटारविमे स्वीकारणारी कंपनी

अमेरिकेंतील, प्रिफर्ड रिस्क म्यूच्युअल विमा कंपनी ही मोटार अपघातांच्या विम्याचें काम करतें. तिचें वैशिष्ट्य असें आहे कीं ती दारूपान न करणारांचेच विमे स्वीकारते. "मी कोणत्याहि प्रकारची दारू पीत नाहीं व विमा पॉलिसीच्या मुदतींत पिणार नाहीं" असें अर्ज करणाऱ्या विमेच्छूनें लिहून द्यावें लागतें. त्यानंतर, त्याची छाननी केली जाते. इतर कंपन्यांच्यापेक्षा प्रिफर्डचे विम्याचे हप्ते २०% ते ४०% कमी असतात. "तुम्ही दारू पीत नाहीं; मग दारूबाजांच्या अपघातांची रक्कम भरण्यास तुम्हीं कशाला हातभार लावतां?" असें प्रिफर्ड रिस्कचें म्हणणें आहे. नऊ वर्षांपूर्वी ही कंपनी स्थापन झाली. पहिल्या वर्षी तिला फक्त २५० विमेदार मिळाले. आतां तिच्या पटावर १,२०,००० विमेदार आहेत. तिच्यासाठी १,२५० विमा एजंट काम करीत आहेत. ते सर्व दारूपासून अलिप्त असून, त्यांपैकी बहुतेक धूम्रपानहि न करणारे आहेत.


पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., पुणें शहर

**नोटीस**

पुणें सेंट्रल को-ऑप. बँकेच्या सन १९५५–५६ च्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची निवडणूक व्हावयाची आहे. त्यासाठी वैयक्तिक मतदारांची यादी तयार झाली असून ती बँकेच्या मुख्य कचेरींत व शाखा–कचेऱ्यांत नोटीसबोर्डावर निवडणुकीचे नियम नं. ३ प्रमाणें लावण्यांत आली आहे.

तरी निवडणुकीसाठी लायक उमेदवारांचीं नांवें सूचक व अनुमोदक यांच्या सहीसह व उमेदवाराचे लेखी संमतीनें दिनांक १०–८–५५ रोजीं दुपारीं चार वाजेपर्यंत अगर त्यापूर्वी बँकेच्या मुख्य कचेरींत दाखल होतील अशा बेतानें पाठवून द्यावींत

सदरबाबत जास्त माहिती पाहिजे असल्यास ती बँकेच्या मुख्य कचेरींत कामाचे वेळांत मिळूं शकेल.

पुणें शहर.
ता. १२–७–१९५५.

मो. वि. रबडे.
मॅनेजिंग डायरेक्टर.

## अमेरिकेंतील मोटारकारखान्यांचें उत्पादन

अमेरिकेंत मोटारगाड्यांचा सुकाळ करणारा पहिला हेन्री फोर्ड ज्या काळांत जन्मला तो काळ अमेरिकेंत सुद्धां सर्वच बाबतींत अपुऱ्या उत्पादनाचा होता. अर्थातच त्यांच्या औद्योगिक जीवनांत फाजील उत्पादनाचा प्रश्न उपस्थितच झाला नाहीं. हेन्री फोर्ड ह्यांना एका अर्थानें तत्वज्ञ सुद्धां म्हणतां येण्यासारखें आहे. कारण, मानवी समाजाचें हित आणि त्याची परिस्थिति ह्या विषयाचा ते मनांत विचार करीत असत. वस्तू विकत घेण्याला लागणारा पैसा लोकांच्यापाशीं असेल तर त्यांना अधिकाधिक वस्तू कशा पुरवाव्या ह्याच प्रश्नाचा त्यांनीं मुख्यतः विचार केला. पण आतां काळ पालटला आहे. आज अमेरिकेंतील रस्त्यांवरून ५ कोटी मोटारी धांवत आहेत. अमेरिकेंतील प्रत्येक कुटुंबागणीक आतां एक मोटार आहे. त्यामुळें अमेरिकेंतील मोटारकारखानदारांपुढें असा पेंच उत्पन्न झाला आहे कीं किती मोटारी उत्पादन केल्या असतां त्या फाजील उत्पादन ह्या सदरांत पडणार नाहींत.

पहिल्या हेन्री फोर्डचे नातू ह्यांनीं आधींच भरपूर उत्पादन होत असलेल्या अर्थव्यवस्थेंत उत्पादन कसें चालू ठेवतां येईल ह्या कठिण प्रश्नाविषयीं आपले विचार अमेरिकन वृत्तपत्रप्रकाशकांच्या असोसिएशनपुढें मांडले आहेत. ते म्हणतात कीं, अजून सुद्धां अमेरिकेंत १७७६ सालीं ॲडम स्मिथनें प्रतिपादलेल्या अर्थशास्त्रीय विचारांचा पगडा असणारे धंदेवाले आहेत. उलटपक्षीं कार्ल मार्क्सच्या विचारसरणींत मुरलेले लोक यंत्र म्हणजे मनुष्याचा आत्मा नष्ट करणारा व शरीर दास्यांत ठेवणारा एक राक्षस आहे असें म्हणतांना आढळून येतात. सध्यां सर्वच जगांत नव्या नव्या यांत्रिक उत्पादन–पद्धति अंमलांत येत आहेत. अशा काळांत औद्योगिक जगतांत तात्पुरती अस्वस्थता उत्पन्न होणें अपरिहार्यच आहे. यंत्रांच्या वापरामुळें कांहीं चालू व्यवसाय–नोकऱ्या नाहींशा होतात; पुष्कळदां समाजाचा एखाद्या विभागच विभाग मोठ्या अडचणींत सांपडतो हेंहि खरें. तथापि निदान अमेरिकेंत तरी उद्योगपतींनीं व सरकारनें अशा तऱ्हेची यंत्रणा उभी केली आहे कीं, तीमुळें आपत्तींत सांपडलेल्या लोकांना साह्य मिळूं शकतें. बेकारीचा विमा, खाजगी रीतीनें व संस्थांमार्फत अंमलांत आणल्या जाणाऱ्या पेन्शनच्या योजना, बेकारांना मदत देण्याच्या योजना, इत्यादि प्रकारची ही यंत्रणा आहे.

नवीन यांत्रिक सुधारणांमुळें फाजील उत्पादन होऊन उत्पादनांत खंड पडण्याचें कारण नाहीं असें त्यांचें म्हणणें आहे. ह्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ त्यांनीं असें जाहीर केलें कीं, पुढील तीन वर्षांत फोर्ड मोटार कंपनी ६२·५ कोटी डॉलर्सची नवी उत्पादक मालमत्ता वापरांत आणणार आहे. १९४६ सालापासून कंपनीनें आपल्या कारखान्याचा विस्तार व पुनर्घटना करण्यासाठी १७० कोटी डॉलर्स गुंतविले आहेत आणि तरीसुद्धां बाजारपेठेंतील मागणी तिला पुरी करतां आलेली नाहीं. अमेरिकेंतील इतर मोटारकंपन्याहि उत्पादन वाढविण्याच्या योजना अमलांत आणणार आहेत. जनरल मोटार्स ही कंपनी चालू वर्षीं ५० कोटी डॉलर्सचें नवें भांडवल गुंतविणार आहे. क्राइसलर कंपनी १२ कोटी डॉलर्स खर्च करून आपल्या कारखान्याची उत्पादनक्षमता वाढविणार आहे. अमेरिकन मोटार्स कॉर्पोरेशन ही कंपनी ह्याच कामासाठी ६ कोटी डॉलर्स खर्च करणार आहे. कांहीं अर्थशास्त्रज्ञांनीं मोटारींचें फाजील उत्पादन होण्याच्या धोक्याकडे लक्ष वेधलें असतांहि ही नव्या भांडवलाची गुंतवणूक करण्यांत येणार आहे.


दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

अन्नाचें रहस्य




बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ

— वृ. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७६,००० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

| | |
|---|---|
| श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. | न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष. |
| रावसाहेब य. वृ. खोले. | श्री. चं. रा. राठी. |
| श्री. गो. वा. देवी | श्री. बा. ग. धंडुके. |

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर. } एन्. व्ही. पांडव, मॅनेजर

### सहकारी चळवळीस चालना

मुंबई राज्यांत अस्तित्वांत असलेल्या शेतकरी कर्ज निवारण कायद्याच्या अंमलबजावणीमुळें शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी झाला आहे, हें सदरहू कायद्याच्या अंमलबजावणीबाबतच्या १९५३–५४ सालच्या अहवालावरून दिसून येतें.

सदरहू कायद्याची अंमलबजावणी सुरू होतांच शेतकऱ्यांना सावकारांकडून मिळणाऱ्या कर्जाचें प्रमाण कमी झालें. म्हणून शेतकऱ्यांना शेतीसाठीं कर्ज मिळावें म्हणून सरकार सहकारी सोसायट्यांच्या स्थापनेस चालना देत आहे. १९५३–५४ सालीं ५९,३२६ ऋणकोंना सहकारी सोसायट्यांमार्फत एकूण १·३२ कोटी रुपयांचीं कर्जें देण्यांत आलीं.

त्याशिवाय तगाई, धान्यबँका आणि अधिकृत सावकार या तीन मार्गांनींहि शेतकऱ्यांना शेतीसाठी पैसा पुरविण्यांत येतो. तथापि या मार्गानें त्यांना पुरविण्यांत येणाऱ्या पैशाची रक्कम फार मोठीं नसते. अहवालाच्या वर्षीं तगाई आणि धान्य-बँकांच्या मार्फत त्यांना ५ लाखांपेक्षा थोडी अधिक रक्कम देण्यांत आली आणि सावकारांनीं दोन लाखांपेक्षा अधिक रकमेचीं कर्जें दिलीं.

रजिस्ट्रार ऑफ को–ऑपरेटिव्ह सोसायटीज् हे पुढील कामें करतात : ( १ ) शेतकऱ्यांनीं शेतकरी कर्ज निवारण कायद्याचा जास्तींत जास्त फायदा घ्यावा म्हणून प्रचार करणें; ( २ ) कर्जदारांची कर्जफेडीची कुवत अजमाविण्याच्या बाबतींत न्यायालयांना मदत व मार्गदर्शन करणें; ( ३ ) ज्यांच्या कर्जाचे बाबतींत तडजोड झाली असेल अशा शेतकऱ्यांना शेतीसाठी पैसा पुरविण्याची व त्याची नियमितपणें परतफेड होण्याची व्यवस्था करणें आणि ( ४ ) न्यायालयांनीं दिलेल्या निवाड्या-प्रमाणें कर्जाच्या हप्त्यांची परतफेड होत आहे कीं नाहीं तें पाहणें. मुंबई शेतकरी कर्ज निवारण कायद्याखालील अथवा त्या कायद्याखालील निवाडा लागू असणाऱ्या पक्षकाराला शेतीसाठी अथवा हंगामासाठी सहकारी सोसायट्यां-मार्फत कर्ज मिळावें असें सरकारचें धोरण आहे. तेव्हां या धोरणा-नुसार शेतकी पतपेढ्या, बचत आणि क्रेडिट सोसायट्या आणि विविधोपयोगी सहकारी संस्था स्थापन करण्यासाठीं उपाययोजना करण्यांत येत आहे. जेथें शक्य असेल तेथें कर्जदार शेतकऱ्यां-च्या शेतमालाच्या विक्रीस मदत व्हावी म्हणून विक्री संस्थाहि स्थापन करण्यांत येतात. याचा परिणाम म्हणून अहवालाच्या सालीं २३४ शेतकी पतपेढ्या आणि बचत व क्रेडिट सोसायट्या, ३६४ विविधोपयोगी संस्था नोंदविण्यांत आल्या. तसेंच तीन विक्री संस्थाहि नोंदविण्यांत आल्या. १७९ पतपेढ्यांचें व बचत सोसायट्यांचें विविधोपयोगी संस्थेंत रूपांतर करण्यांत आलें.

अंशतः अपुऱ्या व अवेळीं पडलेल्या पावसामुळें व पिकांच्या नुकसानीमुळें आणि अंशतः किंमती उतरल्यामुळें पुणें, अहमद-नगर, उत्तर सातारा, दक्षिण सातारा, नाशिक, पश्चिम खानदेश, पूर्व खानदेश या जिल्ह्यांत अनधिकृत थकबाक्यांच्या रकमा बऱ्याच वाढल्या आहेत.

---

**शिक्षण फुकट मिळण्याची सोय**—मध्य प्रदेश सरकारनें सुमारें १५,००० शाळकरी व कॉलेजमधील हरिजन व मागास-लेल्या जमातींतील विद्यार्थ्यांना फी न देतां शिक्षण घेण्याची सवलत देण्याचें ठरविलें आहे. ह्या सवलतीचा फायदा जसजसा घेण्यांत येईल, तसतसा सरकारला ५ लाखांपासून १० लाख रुपयांपर्यंत खर्च सोसावा लागेल.

### डॉलर्स मिळविण्यासाठी माकडांची निर्यात

भारतामधून माकडांची निर्यात मात्र खास परवानगीनें करतां येते. कांहीं महिन्यापूर्वी भारतामधून अमेरिकेला विमानानें पाठ-विण्यांत आलेल्या माकडांपैकी सुमारें १,००० माकडें लंडन येथें गुदमरून मेलीं, अशी वार्ता आली होती. ही वार्ता लक्षांत घेऊन माकडांच्या निर्यातीला भारतीय सरकारनें बंदी केली होती. तथापि आतां पुढील पांच वर्षांत दरवर्षी १ लाख माकडें निर्यात करण्याचें सरकारनें ठरविलें आहे, असें समजतें. माकडांची निर्यात केल्यामुळें भारताला डॉलर्सचें चलन मिळतें. म्हणून हा धंदा वाढविण्याचा सरकार प्रयत्न करणार आहे. पांच वर्षे संपल्यानंतर त्यापुढील तीन वर्षांत दरसाल २·५ लाख माकडें निर्यात करण्यांत येतील अशी अपेक्षा आहे. भारतामधून माकडांची निर्यात करण्यासंबंधी सरकारनें झुलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिआचा सल्ला घेतला होता. ह्या खात्यानें दिलेल्या सल्ल्याला अनुसरूनच निर्यातीचा कार्यक्रम आखण्यांत आला आहे. माकडांची निर्यात करण्यासाठी ह्यापुढें परवानापद्धतीचा अवलंब करण्यांत येईल असें समजतें. माकडांना निर्दयपणानें वागविण्यांत येऊं नये अगर संकल्पित कामापेक्षा वेगळ्या कामासाठी त्यांचा उपयोग करण्यांत येऊं नये, म्हणून ही पद्धति अंमलांत आणण्यांत येणार आहे. भारतामधील प्राण्यांच्या जीवनाचा पद्धतशीर अभ्यास करण्यांत आलेला नाहीं. माकडांची निर्यात करण्याचें ठरलें तर निदान त्यांच्यासंबंधीं तरी असा अभ्यास सुरू होईल. त्यामुळें माकडांच्या संख्येंत वाढ होण्याचा काळ, त्यांना मानवणारें हवा-मान, इत्यादि बाबतींत शास्त्रीय संशोधन करण्यास मदत होईल.

### मृतांना जाळण्यासाठी विजेच्या भट्ट्या

मुंबईमधील मृतांना जाळण्यासाठी चंदनवाडींत विजेच्या भट्ट्या ५ लक्ष रु. खर्चून बसविण्यांत आल्या आहेत. पण त्यांचा वापर करणारे फारच थोडे आढळतात. या बाबतींत जागृति करण्याचा मुंबई कॉर्पोरेशननें प्रयत्न चालविला आहे. विशेषतः पावसाळ्यांतील सर्द हवेंत ह्या भट्ट्या अधिक सोईच्या आहेत. बारा वर्षांखालील मुलांच्या प्रेतास ८ रु. १२ आ. व बाकीच्यां-च्या प्रेतास १७ रु. ८ आ, असे भट्टीचे दर ठरविण्यांत आलेले आहेत.

### उसाच्या उत्पादनांत २५% वाढ

१९५४–५५ मध्यें भारतांत ३९,३२,००० एकरांत उसाची लागवड होऊन उसाचें उत्पादन ५,४६,४८,००० टन भरलें. म्हणजे, १९५३–५४ मधील लागवडीपेक्षा ही लागवड १२·४% अधिक झाली व उसाचें उत्पादन २४·६% नें सुधारलें. गुळाच्या हिशेबानें, पूर्वीच्या वर्षीं ४४,६४,००० टन उत्पादन झालें, तें आतां ५५,४६,००० टन झालें.

### कोटेलवाला ह्यांचें ‘भूदान’

सर जॉन कोटेलवाला, सिलोनचे पंतप्रधान, ह्यांनीं आपला २०० एकरांचा नारळाच्या झाडांचा मळा सिलोन सरकारच्या स्वाधीन केला आहे. भूहीन खेडुतांत ही जमीन वाटून दिली जाईल.

---

**सिमेंट कॉंक्रीटचा नवा पूल**—उत्तर–प्रदेशांतील मिर्झापूर जिल्ह्यांत शोन नदीवर सिमेंट–कॉंक्रीटचा मोठा पूल बांधण्यांत येत आहे. पुलाची उंची १५० फूट असून त्याला २२ कमानी आहेत. रिव्हंड धरणाच्या जागेला जाण्यासाठी रॉबर्टसगंज स्टेशनाचा उपयोग त्यामुळें करतां येईल. पुलासाठी सुमारें ५० लाख रुपये खर्च येईल.

## वजनदार बीं व पिकांचें उत्पन्न

पिकाची लागवड सर्व प्रकारें व्यवस्थित झालेली असून सुद्धां वजनदार बीं पेरल्यामुळें पिकाच्या उत्पन्नांत पुष्कळच वाढ होते असें मद्रासमधील नंजनाड येथील संशोधनकेंद्रावर झालेल्या प्रयोगावरून समजून आलें आहे.

लवकर तयार होणाऱ्या म्हणजे हळव्या जातीच्या भाताचें पूर्ण भरलेलें व वजनदार बीं पेरण्यांत आल्यामुळें हलकें व पोचट बीं पेरलेल्या पिकापासून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा जास्त उत्पन्न आलेलें आहे. वजनदार बीं वापरल्यानें उत्पन्नवाढीचें हें दृश्य कंद जातीच्या म्हणजे बटाटे, सुरण, अशा प्रकारच्या पिकांमध्यें फारच स्पष्टपणें विशेष ठळक असें दिसून येतें. वरील संशोधन-क्षेत्रावर सुरणाच्या पिकावर हे प्रयोग करण्यांत आले. याकरितां सुरणाच्या गड्ड्याचे ½ पौंड, १ पौंड, १½ पौंड व २ पौंड असे निरनिराळ्या वजनाचे प्रत्येकांस निदान एक तरी डोळा असलेले बीं याकरितां तुकडे करून ते लावण्यांत आले. वरील प्रत्येक प्रकारच्या वजनाच्या बियांचे निरनिराळे प्लॉटस प्रत्येक प्लॉट-करितां दुय्यम प्लॉट ठेवून प्रयोग करण्यांत आले. वरील प्लॉटमध्यें बियाच्या फरकाशिवाय मेहनत, मशागत, खत, पाणी, वगैरेंत कोणताहि फरक न ठेवितां सारखेपणा ठेवण्याची खबरदारी घेण्यांत आली होती. अर्थात्, जमीनहि सारखीच होती हें सांगण्यास नकोच.

वरील बीं लावलेल्या प्लॉट्समधील पिकें वाढूं लागलीं तशीं वजनदार बीं लावलेल्या प्लॉटमधील झाडें कमी वजनाच्या बियांपासून झालेल्या झाडांपेक्षा जोमांत वाढत असलेलीं दिसून आलीं. वजनदार बीं पेरलेल्या बियांपासून झालेल्या झाडांमध्यें व इतर झाडांच्या वाढीमध्यें कसकसा फरक होत जातो, यासंबंधानें पीक सहा महिन्यांचें झाल्यानंतर त्यांची उंची व घेर यांचीं मापें घेण्यांत आलीं.

उत्पन्न व इतर माहिती देणारे तक्ते खालीं दिले आहेत, त्यावरून पूर्ण कल्पना येईल.

तक्ता नं. १

### बियाचें वजन व पिकाचें उत्पन्न

| खुलासा | बियाचें वजन | | | | सर्व-साधारण |
|---|---|---|---|---|---|
| | ½ पौंड | १ पौंड | १½ पौंड | २ पौंड | |
| एकरीं उत्पन्न ( पौंड ) | ५०४० | ६७२० | ९२८० | ११४४० | ८१२० |
| ½ पौंड बियांचें उत्पन्नावरून शे. वाढ | १०० | १३३·३ | १८४·१ | २२७ | १६१·१ |

वरील तक्त्यावरून दिसून येईल कीं, बियांचें वजन जास्त होत गेलें त्याप्रमाणें उत्पन्नहि वाढत गेलेलें आहे. बियांच्या सर्वांत थोडी वाढ झालेली असली तरी एकंदरींत वजनदार बेणें वापरणें उत्पन्नाच्या दृष्टीनें फायदेशीरच होईल. वरील बाबतींत ½ पौंड वजनाचें बेणें वापरावें असें आम्हीं सुचवितों.

तक्ता नं. २

### बियाचें वजन व झाडाची वाढ

| बियाचें वजन | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ½ पौंड | | १ पौंड | | १½ पौंड | | २ पौंड | |
| उंची | व घेर | उंची | व घेर | उंची | व घेर | उंची | व घेर |
| इंच ११·५ | २·३ | १३·६ | ३·६ | १६·३ | ४·० | १८ | ५·० |

वरील तक्त्यावरून वजनवाढीप्रमाणें झाडाच्या वाढींतहि फरक पडलेला दिसून येतो.

( मद्रास ॲग्रि. जर्नल, एप्रिल १९५५ )

## रिझर्व्ह बँकेच्या तपासणीनें दाखविलेल्या बँकांच्या दोषांचें निराकरण

( आकडे लक्ष रुपयांचे )

| दोषाचें स्वरूप | बँकांची संख्या | तपासणीच्या दिवशींची रक्कम | ३१–१२–५४ रोजींची रक्कम | वाढ (+) घट (–) चें प्रमाण (%) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. अपुरे रिझर्व्ह ... ... ... | १८८ | १,१४·९३ | १,४४·८३ | + २६·० |
| २. बुडीत व संशयित कर्जांची अपुरी तरतूद ... ... | १६ | ३·४३ | ३·९५ | + १५·२ |
| ३. वारंवार कर्ज काढणें ... ... ... | ५१ | ५,१२·६५ | २,६३·६२ | – ४८·६ |
| ४. (अ) कंपन्यांच्या शेअर्समध्यें व डिबेंचर्समध्यें मोठी गुंतवणूक | १४ | ६५·६० | ५२·०८ | – २०·६ |
| (ब) कोटेशन नसलेल्या शेअर्समध्यें व डिबेंचर्समध्यें गुंतवणूक | ३३ | २,१३·८९ | १,५४·८६ | – २७·६ |
| ५. बँकेच्या डायरेक्टरांचे हितसंबंध असलेल्या कंपन्यांच्या शेअर्स-मध्यें व डिबेंचर्समध्यें गुंतवणूक... ... ... | १९ | १,२४·५७ | ८२·६२ | – ३३·७ |
| ६. सरकारी रोख्यांत अपुरी गुंतवणूक ... ... | ७५ | ११·१४ | ३०·५४ | + १७४·१ |
| ७. अपुरी तरती जिंदगी ... ... ... | ४९ | ८३·९२ | १,२२·१६ | + ४५·६ |
| ८. मर्यादेबाहेर कर्जें ... ... ... | २४० | ५०,१९·०३ | ४८,१२·११ | – ४·१ |
| ९. विना–तारण कर्जें ... ... ... | १८३ | ९,६१·६१ | ८,८३·७८ | – ८·१ |
| १०. स्थावरावर अप्रमाण कर्जें ... ... ... | १०८ | १२,१३·६१ | १०,५०·७२ | – १३·४ |
| ११. डिक्री मिळविलेलीं व संशयित कर्जें ... ... | १६० | ४,०२·७० | ४,९६·८९ | + २३·४ |
| १२. अयोग्य कर्जें ... ... ... | २०२ | २७,१२·५५ | २१,२८·८५ | – २१·५ |
| १३. थोड्या हातीं मोठीं कर्जें ... ... ... | ९३ | २२,६७·३५ | १६,०२·७७ | – २९·३ |
| १४. डायरेक्टर, त्यांचे नातेवाईक, सहकारी, फर्म्स, ह्यांना मोठीं कर्जें | ७० | ६,७४·६७ | ५,२३·५४ | – २२·४ |

## भात सडण्याच्या गिरण्यांऐवजीं हातसडीच्या तांदळाचा धंदा

### राइस मिलिंग कमिटीच्या शिफारशी

सुमारें पांच वर्षांच्या अवधींत सहकारी तत्त्वावर संघटित व विकसित स्वरूपाच्या हातसडीच्या धंद्यानें भारतांतील भात सडण्याच्या गिरण्यांची जागा घ्यावी ही राइस मिलिंग कमिटीची मुख्य शिफारस आहे.

सदर गोष्टीमुळें ग्रामीण विभागांतील जनतेस रोजगाराचें जादा साधन उपलब्ध होईल, शेतमजुरांमधील हंगामी बेकारी कमी होईल आणि देशांतील भात सडखाणाऱ्या जनतेस अधिक पोषणमूल्य असलेला तांदूळ मिळेल.

### व्यापक प्रमाणावर चौकशी

समितीनें नोव्हेंबर १९५४ मध्यें आपल्या कामास प्रारंभ केला. तिनें संबंधित सर्व माहिती व आंकडेवारी गोळा केली आणि राज्य सरकारांची, तशींच संस्थांची व भात गिरणींत सडण्याच्या वा हातानें सडण्याच्या प्रश्नांत लक्ष घालूं इच्छिणाऱ्या व्यक्तींचीं मतें गोळा केलीं. सोळा राज्यांतून दौरा काढून विविध प्रकारच्या भात सडण्याच्या गिरण्यांना, हातसडीच्या तांदळाच्या निरनिराळ्या केंद्रांना आणि अद्यापिहि हातानें तांदूळ सडण्यांत येतो अशा घरांना समितीनें भेटा दिल्या. निरनिराळ्या राज्यांतील ग्रामीण मजुरांसुद्धां प्रातिनिधिक भात खाणाऱ्या लोकांच्या समितीनें मुलाखती घेतल्या.

### पूरक उद्योगधंदा

समितीचा अहवाल टाइप केलेल्या २४६ फुलस्केप पृष्ठांचा असून तो सरकारला नुकताच सादर करण्यांत आला आहे. अहवालांत असें म्हटलें आहे कीं, भात सडण्याच्या गिरण्या अस्तित्वांत येईपर्यंत वर्षांतून ४ ते ८ महिने असणाऱ्या विनहंगामी काळांत बेकार शेतमजुरांना भात सडणें हा पूरक उद्योगधंदा असे गिरणींत सडलेल्या तांदळाचा स्पर्धेत टिकूं शकणारा स्वस्तपणा आणि सुरेखपणा हे गुण हातसडीच्या तांदळाआड येतात. तशांतच नियंत्रणाच्या दिवसांत भात सडून तो साफ करण्याचें व त्याच्या वांटपाचें काम कांहीं राज्यांत सरकारनें गिरण्यांवर सोंपविलें होतें आणि भाताची खासगी विक्री बंद करण्यांत आली होती त्यामुळेंहि हातसडीचा प्रकार मागें पडला.

तांदूळ साफ करण्याच्या पद्धतींत जवळ जवळ सर्व पोषकद्रव्यें नष्ट होत असलेला गिरणींत सडलेला तांदूळ खाण्याच्या संवयीचा परिणाम तो खाणाऱ्यांचें आरोग्य खालावण्यांत, विशेषतः ज्यांना पूरक अन्नाची जोड देणें परवडत नाहीं अशा वर्गाचें आरोग्य खालावण्यांत होणार हें नक्कीच असें समितीचें मत आहे.

### पोषणदृष्ट्या विचार

बेकार ग्रामीण जनतेचे दृष्टीनें त्यांस असलेलें सामाजिक, आर्थिक महत्त्व लक्षांत घेऊन, तसेंच पोषणमूल्याचेहि दृष्टीनें हातसडीच्या तांदळाचा धंदा संघटित करण्यांत यावा आणि अन्नपदार्थ म्हणून गिरणींतील तांदळाची जागा हातसडीचा तांदूळ घेईल इतक्या मर्यादेपर्यंत त्या धंद्याचा विकास करण्यांत यावा असें समितीचें मत आहे.

हें उद्दिष्ट साध्य होण्याच्या दृष्टीनें समितीनें इतर गोष्टींबरोबरच पुढील गोष्टींची शिफारस केली आहे:— सर्व भात गिरण्यांची खानेसुमारी करणें आणि १९५५ च्या आवश्यक वस्तुविषयक कायद्याखालीं सर्व राज्यांतून हातसडीच्या तांदळाचीं केंद्रें स्थापन करणें. अगदीं आणीबाणीच्या वेळेखेरीज नव्या भात गिरण्यांना किंवा संयुक्त गिरण्यांत भातसडीची गिरणी उघडण्यास परवाने देण्यांत येऊं नयेत.

### गिरणी तांदुळावर कर

गिरणींत सडलेल्या तांदळावर दर मणामागें सहा आणे कर बसविण्याची सूचना समितीनें केली आहे. त्या करांतून मिळणाऱ्या उत्पन्नाचा विनियोग हातसडीच्या तांदळाचा धंदा संघटित करण्याकडे, सुधारलेल्या अवसारांच्या संशोधनासाठी आणि हातसडीच्या तांदळास आर्थिक साह्य देण्यासाठी करण्यांत यावा.

याशिवाय सध्यांच्या गिरण्यांत दररोज सहा तासांपेक्षा अधिक वेळ चालविण्यास अगर त्यांची प्रचलित कार्यशक्ति वाढविण्यास परवानगी देण्यांत येऊं नये असें कमिटीस वाटतें.

तांदूळ सडण्याच्या यंत्रांचा फार सुळसुळाट झाला असून त्यांनीं खेड्यांतहि चांगलाच शिरकाव केला आहे. या अहवालांत त्यावर कडक टीका करण्यांत आली आहे. 'हातसडीच्या धंद्यावरील फार मोठें संकट' असें या यंत्रांचें वर्णन करून त्यांच्या उच्चाटनाकरतां तांतडीनें उपाययोजना करण्याची शिफारस या कमिटीनें केली आहे कोणत्याहि प्रकरणीं अशा प्रकारचीं तांदूळ सडण्याचीं लहान यंत्रें चालविण्यास असलेल्या परवान्यांचे ३१ डिसेंबर १९५६ नंतर नूतनीकरण करण्यांत येऊं नये.

### प्रत्यक्ष चालना

हातसडीच्या धंद्यास प्रत्यक्ष चालना देण्याकरतां, सडलेल्या सडलेल्या भातास सध्यां दर मणामागें सहा आणेप्रमाणें मिळणारी मदत वाढवून दर मणामागें आठ आणे करण्यांत यावी अशी शिफारस कमिटीनें केली आहे. ही मदत पांच वर्षेपर्यंत चालू ठेवावी व त्यानंतर सरकारनें याबाबतच्या परिस्थितीचें पुनर्विलोकन करावें.

हातसडीच्या धंद्यांत असलेल्या अ. भा. खादी व ग्रामोद्योग कमिशननें (बोर्ड) शिफारस केलेल्या व्यक्ति व संघटना यांना सुहजसुलभ कर्जे सवलतीच्या दरानें अवजारें, व विक्रीकर लागू असल्यास त्यास माफी या गोष्टींची तरतूद करावी अशी शिफारस कमिटीनें केली आहे.

तुरुंग, रुग्णालयें, सरकारी रुग्णालयें, रेल्वे, सैन्यदलें, पोलिस खातें इ. ठिकाणीं लागणाऱ्या तांदळाच्या गरजा भागविण्यासाठी सरकारनें केवळ हातसडीचा तांदूळच विकत घ्यावा. रेल्वे कॅन्टीनांसारख्या सरकारी मदत मिळणाऱ्या संस्थांतूनहि असाच तांदूळ वापरण्यास उत्तेजन देण्यांत यावें अशी समितीची शिफारस आहे.

---

**चितूर येथें सहकारी साखर कारखाना**—आंध्र सरकारनें चितूर येथें सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारा साखरेचा कारखाना काढण्यासाठी सूचना दिल्या आहेत. तीन महिन्याच्या आंत ३ लाख रु. भागभांडवल जमविण्यांत यावें, अशी सरकारची इच्छा आहे. एवढें भांडवल जमविल्यावर मगच मध्यवर्ती सरकार कारखाना काढण्यास परवानगी देणार आहे. एकूण भांडवल सुमारें ६५ लाख रुपये लागेल.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.